
## ■ माजी प्राध्यापकांचा थोडक्यात परिचय

### डॉ. गो.मा.पवार



डॉ. गो.मा. पवार हे जेष्ठ समीक्षक व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे चरित्रकार म्हणून ओळखले जातात. प्रा. पवार यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील (ता. बार्शी) पानगाव या गावी झाला. शालेय शिक्षण नरखेड तर उच्च माध्यमिक शिक्षण सोलापूर येथील हरीभाई देवकरण प्रशालेतून पूर्ण झाले. पदवीचे शिक्षण (बी.ए.) स. प. महाविद्यालय पुणे व पदव्युत्तर (एम.ए.) पुणे विद्यापीठातून झाले. मराठवाडा विद्यापीठ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ) औरंगाबाद १९७६ साली 'विनोदाचा औपपत्तीक विचार' या विषयावर वा. ल. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर काही कालावधीसाठी विदर्भ महाविद्यालय, अमरावती (१९५९-६०) ज्ञानविज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद (१९६०-६८) मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (१९६८-६९) येथे आधिव्याख्याता व प्रपाठक म्हणून अध्यापन कार्य केले. पुढे कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या मराठी आधिविभागात १९७९ ते १९९२ या काळात प्राध्यापक व विभागप्रमुख या पदावर कार्यरत होते. सौंदर्यशास्त्र, समीक्षा, एका लेखकाचा अभ्यास – व्यंकटेश माडगुळकर इत्यादी अभ्यासपत्रिकेंचे ते अध्यापन करत असत. मुळातच समीक्षा हे त्यांचे विशेष अभ्यासक्षेत्र होते. साहित्यासहित इतर शिक्षण विषयक संस्थामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असे. १९७० पासून ते पुण्यातील समाज प्रबोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळावर सदस्य होते. महाराष्ट्र राज्याची महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य संपादन समिती सदस्य (१९७३-१९७८) महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ सदस्य (१९७७-८०, व २००६ पासून ) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ सदस्य (१९७४-७९), विद्यापीठ अनुदान मंडळाची आधुनिक भारतीय भाषा समिती सदस्य (१९८०- ८४) म्हणून ते कार्यरत होते. काही कालावधीसाठी औरंगाबाद येथील मराठवाडा साहित्य परिषदेत चिटणीस पदाचीही जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. २००६ पासून महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळामध्ये व विद्यापीठाच्या विविध समित्यामध्येही त्यांनी उल्लेखनिय काम केले आहे.

प्रबोधनात्मक कार्य करणाऱ्या अनेक जेष्ठ व्यक्तींच्या सानिध्यात ते सतत असत. प्रारंभीचे त्यांचे वैचारिक संक्रमण हे विवेकनिष्ठ जीवनदृष्टी (१९६६) या स्वलिखित ग्रंथातून आविष्कृत झाले आहे. पुढे अध्यापनाच्या अनुषंगाने त्यांची ग्रंथ निर्मिती झालेली दिसते. *साहित्यमूल्य आणि अभिरुची* (१९९४) *विनोद: तत्त्व आणि स्वरूप* (२००६) *मराठी विनोद विविध अविष्काररूपे* (२०१५), *सुहृद आणि संस्मरणे* (२०१७) *व्यंकटेश माडगुळकर साहित्य आणि व्यक्तित्व* (२०१९) हे त्यांचे ग्रंथ प्रकाशित आहेत. प्रा. पवार यांची समीक्षामांडणी ही तात्त्विक स्वरूपाची आहे. त्यांनी समीक्षाव्यवहारात आभिरुचीला केंद्रवर्ती स्थान दिलेले आहे. त्यांनी नाटक वाङ्मयासंबधीची सुखान्तिकेची संकल्पना मांडली. पाश्चात्य व भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी विनोदाविषयी मांडलेल्या उपपत्तींचा सखोल अभ्यास केला आणि त्याआधारे विनोदविषयक सिद्धान्त मांडला. वास्तविक विनोदात्म संकल्पनेचा स्वतंत्र आकृतिबंध मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. मराठी साहित्यविश्वातील समीक्षा, नाटक यासंबधीचे त्यांचे संशोधन आणि सैद्धान्तिक ग्रंथाची निर्मीती आतिशय महत्त्वपूर्ण आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि त्यांचे कार्य या बद्दल गो. मा. पवारांना विशेष आस्था होती. त्यांच्या कार्याची महत्त्वपूर्ण दखल घेणे व त्याचे संशोधन करणे, हेच त्यांचे जीवनध्येय होते. हे यासंबधी गो. मा. पवार यांच्या देश-विदेशातील अभ्यास दौऱ्यावरून स्पष्ट होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंच्या कार्याविषयी (मुलभूत) संशोधन सामग्री मिळविण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाच्या योजनेनुसार १९८३ मध्ये इंग्लंड, नेदरलंड, इटली येथे प्रवास दौरे झाले. भारत देशातील मंगलोर, मद्रास, तंजावर, बडोदा, दिल्ली, बेळगाव, मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणी १९८७ ते १९९२ या काळात महर्षी शिंदेच्या कार्यसंशोधनासाठी अभ्यास दौरे केले. या त्यांच्या अभ्यासपूर्ण जगभ्रमंतीवरूनच त्यांची महर्षी शिंदे या व्यक्तिमत्वाविषयीची विशेष निष्ठा निदर्शनास येते. हे मूलभूत संशोधन कार्य करीत असताना महर्षी शिंदेंच्या जीवनकार्यावर त्यांनी पुस्तके लिहिली *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे* (राष्ट्रीय चरित्रमाला) (१९९०), *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे* (भारतीय साहित्याचे निर्माते) (२०००), *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे* (कुमार वाचकासाठी) (२००४), *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन आणि कार्य* (बृहतचरित्र) (२००६) इत्यादी ग्रंथाची निर्मिती केलेली आहे. तर संपादित ग्रंथात *निवडक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे* (१९९९) , *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड -१* (संपादन १९९०) *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य* (२००४) इत्यादी समावेश आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंच्या या विस्तारीत व प्रबोधनात्मक जीवनपटाचा व्यापक पैस प्रस्तुत स्वनिर्मिती व संपादित ग्रंथामधून उलघडण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.


डॉ. गो.मा. पवार यांचे मराठी साहित्यक्षेत्रातील समीक्षा, विनोद सिद्धान्त, नाटकाविषयीची संकल्पना मांडणी इत्यादी संबंधीच्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे एक साक्षेपी समीक्षक आणि ‘महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंच्या जीवनकार्याचे मुलभूत संशोधन व चिंतन यामुळे द्रष्टे इतिहास संशोधक या दोन असामान्य कार्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वास व वाङ्मयीन संशोधाकीय लेखनास सन्मानित व पुरस्कृत केले गेले. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने १९९० साली गो. मा. पवारांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल विद्यापीठीय पातळीवरील आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित केले. त्याचबरोबर १९९४ साली कडोली, जि. बेळगाव येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. डॉ. व. दि. कुलकर्णी स्मृती पुरस्कार, भैरुरतन दमाणी पुरस्कार, शिवगिरीजा प्रतिष्ठान पुरस्कार, कुर्डूवाडी, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठानचा ‘महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, मुंबई पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार प्रवरानगर, महाराष्ट्र फौंडेशनचा मराठी साहित्य पुरस्कार, मुंबई, धोडीराम माने साहित्यरत्न पुरस्कार, औरंगाबाद, शरद प्रतिष्ठानचा शरद पुरस्कार, सोलापूर, मराठवाडा साहित्य परिषदेचा यशवंतराव चव्हाण पुरस्कार, औरंगाबाद इत्यादी पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. तर *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य* या बृहत चरित्र ग्रंथास २००७ चा साहित्य अकादमी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सोलापूर विद्यापीठाच्या वतीने सन २०१६ साली जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापिठातील मराठी आधिविभागातील स्थापनेनंतरच्या प्रारंभीच्या जडणघडणीत गो. मा. पवारांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. नवनवीन अभ्यासक्रमांची मांडणी व अध्यापन, विविध उपक्रमांचा समावेश करून विभागाच्या विकासास मोठा हातभार लावला. अशा या असामान्य व्यक्तिमत्वाचे जीवनकार्य मराठी साहित्य क्षेत्रात मोलाची भर घालणारे आहे.

प्रा. पवार यांचे जवळ जवळ पन्नासहून अधिक संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत त्यात नामवंत लेखकांच्या साहित्यकृतीचे महत्त्व, त्यांची बलस्थाने वाडमयीन संस्कृतीतील अभिरुची संघर्ष, सामाजिक दृष्टिकोनातून साहित्यांची चिकित्सा या विविध विषयावर आणि कथासमीक्षा, मराठी विनोदाची समीक्षा असे अनेकविध महत्त्वपूर्ण विषय आपल्या संशोधनपर लेखांमधून अधोरेखित केलेले आहेत.

सेवानिवृत्तीनंतर हे ते विविध साहित्य व सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी असत वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने १६ एप्रिल २०१९ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले.

## डॉ. ल. रा. नसिराबादकर एम.ए., पीएच.डी.



डॉ. ल. रा. नसिराबादकर हे संत साहित्याचे अभ्यासक व व्यासंगी संशोधक म्हणून ओळखले जातात. लक्ष्मण रामदास नसिराबादकर यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील नसिराबाद या गावी झाला. प्रा. नसिराबादकर यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण जळगाव जिल्ह्यात झाले. पदवी व पदव्युत्तर शिक्षण पुणे विद्यापीठातून झाले. रा. श. वाळिंबे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सामाजिकदृष्ट्या उपेक्षितांच्या जीवनाचे मराठी ललित वाङ्मयातील चित्रण' (१८५७ – १८७०) या विषयावर पीएच.डी. पदवी (१९७४) प्राप्त झाली. रयत शिक्षण संस्थेच्या सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड (१९६०-६२), रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय श्रीरामपूर (१९६२-१९७५), श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर (१९७५-१९७९), तर १९७९ ते १९९५ या काळात शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. १९९२ ते १९९५ या काळात ते विभागप्रमुख होते. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, अर्वाचीन वाङ्मय, नियतकालिंकाचा अभ्यास या अभ्यासपत्रिकांचे अध्यापन करीत असत. प्राचीन मराठी वाङ्मय हे त्यांचे विशेष अभ्यासक्षेत्र होते. प्रा. नसिराबादकर सरांच्या मार्गदर्शनाखाली बावीस विद्यार्थ्यांनी एम. फिल व दहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांचे *प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, आचार्य अत्रे : साहित्यदर्शन*, *व्यावहारिक मराठी* इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहेत. तर इतरांच्या सहकार्याने संपादित केलेले ग्रंथ प्रकाशित केले आहे.

डॉ. हे. वि. इनामदार यांच्या समवेत *प्रा. गं.बा. सरदार साहित्य समालोचन* (१९८०), डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या सहकार्याने *निवडक लोकहितवादी* (१९८४) हा ग्रंथ संपादित केला आहे. तर *नव्या उर्मी, नवी क्षितीजे* (१९८७), *महाराष्ट्राचे लोकनाथ संत एकनाथ* (डॉ. हे. वि. इनामदार व डॉ. मो. स. गोसावी यांच्या सहकार्याने ग्रंथ संपादित (१९८८) केले आहेत. याशिवाय डॉ. हे. वी. इनामदार यांच्या समवेत *महाद्वाराच्या पायथ्याशी* (१९९०) हा ग्रंथ संपादित तर प्रा. नि. ना रेळेकर यांच्या सहकार्याने 'ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी, (१९९१) ग्रंथ संपादित. त्यांचा *प्रबोधनाचा पूर्वरंग* (१९९२) हा ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. प्रा. नसिराबादकर यांनी मराठी विषयाचा अभ्यासक्रम आणि मराठी विभाग यासंबंधीचे महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केले. त्याअंतर्गत जून १९८३ पासून विभागामध्ये 'सामाजिक दृष्टिकोनातून वाड्मयाचा अभ्यास' या अभ्यासपत्रिकेचे अध्यापन करण्यात सुरुवात केली. अशी अभ्यासपत्रिका सुरू करणारा महाराष्ट्रातील हा पहिलाच विभाग होता. जून १९९५ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सतत शिफारस करून प्राध्यापकासाठी उद्बोधन वर्ग प्रथम सुरू केला. त्याचबरोबर उपयोजित मराठीचा पदवी अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी विशेषरूपाने प्रयत्नही केले. सदर अभ्यासक्रमाची १९८३ ला प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली. त्यासाठी 'व्यावहारिक मराठी पदविका' हा स्वतंत्र अभ्यासक्रमही केला. प्रा. नसिराबादकर यांचे संत, ग्रंथ परीक्षणे, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून साहित्य अभ्यास या विविध विषयावर पन्नासहून अधिक संशोधनपर लेख प्रकाशित आहेत. दोन संशोधन प्रकल्पांचे काम त्यांनी पूर्ण केले आहे. त्यामध्ये '१९५० नंतरच्या,

मराठीतील वाङ्मयविषयक नियतकालिकांची सूची या प्रकल्पात 'अस्मितादर्श' नियतकालिकाची १९८२ पर्यंतची सूची डॉ. ह. सि. निर्मळे यांच्या सहकार्याने पूर्ण (अप्रकाशित) केली आहे.

नसरिबादकर यांनी विविध समित्यांवर सदस्य म्हणून काम केले आहे. पुणे, शिवाजी, कर्नाटक, गुलबर्गा, गोवा विद्यापीठांच्या मराठी अभ्यास मंडळांवर त्यांनी काम पाहिले आहे. दिल्ली विद्यापीठाच्या वाङ्मय शाखेचे ते काही काळ सदस्य राहिले होते. संत साहित्य ग्रंथ पारितोषिक समिती, आकाशवाणी सांगली केंद्राच्या सल्लागार समिती, Indian open schooling delhi या संस्थेच्या मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक निर्मिती समिती, पुणे विद्यापीठ पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, गोवा विद्यापीठ गोवा, बनारस विश्वविद्यालय, वाराणसी, गुलबर्गा विद्यापीठ गुलबर्गा या विद्यापीठाच्या प्राध्यापक निवड समितीत विषयतज्ज्ञ म्हणून काम केले आहे. प्रा. नसीराबादकर इतर सांस्कृतिक उपक्रमात ही हिरहिरीने सहभाग घेत. त्यांनी १९९७-९८ या वर्षी आकाशवाणी सांगली केंद्रावरून 'तुका म्हणे' हा प्रकल्प वर्षभर चालविला. आकाशवाणीच्या कोल्हापूर आणि सांगली केंद्रावरून त्यांची तीस आकाशभाषिते प्रसारित झाली आहेत. शिवाय दैनिक 'तरूण भारत'च्या साप्तहिक पुरवणीत २०११ या वर्षात 'राष्ट्रसंत तुकडोजी' या विषयावर लेखनमालिका प्रसिद्ध झाली आहे.

डॉ. ल. रा. नसिराबादकर हे संतसाहित्यावर अधिकांशाने समरस झाले. त्यांच्या संत साहित्यावरील अभ्यासपूर्ण लेखनाने मराठी साहित्यविश्व समृद्ध केले. त्याचबरोबर गं. बा. सरदार यांच्या साहित्यावरील (१९८० मध्ये प्रकाशित) त्यांची समीक्षा महाराष्ट्रात खूप नावाजली गेली. भाषा शुद्धीच्या व मराठी भाषा प्रसारात 'व्यावहारिक मराठी' या ग्रंथाचे महत्त्वाचे योगदान आहे. महाराष्टातील बहुतेक विद्यापीठातील मराठी अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश आहे. निवृत्तीनंतरही ते साहित्य चळवळीत सतत सक्रीय असत.

## प्रा. प्रभाकर पाटील



प्रा. प्रभाकर पाटील हे समीक्षक व साहित्याचे व्यासंगी अभ्यासक म्हणून ओळख होती. त्यांनी महत्त्वपूर्ण असे नाट्यलेखन केले. प्रभाकर शंकर पाटील यांचा दादर (मुंबई) येथे ४ मे १९३७ रोजी झाला. शालेय शिक्षण छबिलदास लल्लुभाई हायस्कूल दादर मुंबई, तर महाविद्यालयीन शिक्षण कीर्ती, एम. डुंगर सी. कॉलेज दादर येथे झाले. डॉ. गो.मा. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली 'तुकाराम व कबीर यांच्या साहित्याच्या तौलनिक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवीसाठी संशोधन करत होते. संशोधन प्रबंध पूर्ण होण्याअगोदरच १८ ऑगस्ट १९९६ रोजी प्रभाकर पाटलांचे हृदयविकाराने आकस्मिक निधन झाले. प्रारंभी ते डेक्कन एज्यूकेशन सोसायटीचे कीर्ती कॉलेज दादर, मुंबई (१९६३-१९७२) या काळात मराठीचे व्याख्याता म्हणून कार्यतर होते. त्यानंतर विद्यावर्धिनीचे अण्णासाहेब वर्तक कॉलेज वसई, जिल्हा ठाणे (१९७२- १९७९) येथे मराठी विभागप्रमुख म्हणून काम पाहिले. पुढे मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात (१९७०-१९७९) काही काळ सव्याख्याता म्हणून कार्यरत होते. १९७९-१९९६ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अधिव्याख्याता या पदावर कार्यरत होते. सौंदर्यशास्त्र, समीक्षा, तौलनिक अभ्यासपत्रिकेचे विभागात ते अध्यापन करत. नाटक हा वाङ्मय प्रकार त्यांचे विशेष अभ्यासक्षेत्र होते. इंग्रजी व हिंदी या दोन्ही भाषेवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. विद्यार्थ्यांनी नेहमी परीक्षार्थी न राहता कायम ज्ञानार्थी रहावे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. मराठी विभागाखेरीज इतर अधिविभागात ते अध्यापन कार्य करत. शिवाजी विद्यापीठाच्या ललितकला विभागातील

नाट्यशास्त्र विभागात सहव्याख्याता म्हणून, तर शिवाजी विद्यापीठाच्याच पत्रकारिता आणि संवादशास्त्र विभागामध्ये सहव्याख्याता म्हणून अध्यापन करत होते. तसेच कोल्हापूर येथील आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटरसाठी मराठी विषयाचे अध्यापनही त्यांनी केले. नाटक चित्रपट साहित्यकृती यासंबधी समीक्षात्मक संशोधनपर लेख विविध नियतकालिकामधून व वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले आहेत. साहित्यातील संप्रदाय, सौंदर्यशास्त्र, नाट्यप्रयोग, चित्रपट, ललितकला यासंबंधी समीक्षापर लेखन केले. ग्रंथ परीक्षणे प्रसिद्ध आहेत. साहित्यकृती, चित्रपटातील सूक्ष्म बारकाव्याच्या समीक्षात्मक नोंदी हे सरांचा लेखाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे. त्यातील काही निवडक संशोधनलेखाचा आढावा घेत असता, साहित्यातील संप्रदाय (डॉ. रा. श. वाळिंबे) महाराष्ट्र टाईम्स (रविवार आवृत्ती) ११ सप्टेंबर १९६६, महानुभव डॉ. विष्णू भिकाजी कोलते, एप्रिल – मे – जुन १९६७, सौंदर्यानुभव (प्रभाकर पाध्ये) सकाळ कोल्हापूर (रविवार आवृत्ती) ९ जानेवारी १९८३, वालेत उभी मी (नाट्यप्रयोग परीक्षण) – महाराष्ट्र टाईम्स (रविवार आवृत्ती) २८ मे १९६७, पिकासाचे नाटक (पुस्तक परिचय) महाराष्ट्र टाईम्स (रविवार आवृत्ती) ९ सप्टेंबर १९६७, व्यासांचा कायाकल्प (वसंत कानेटकर) महाराष्ट्र टाईम्स (रविवार आवृत्ती), २४ मार्च १९६८ मधील नाटक महाराष्ट्र टाईम्स (रविवार आवृत्ती) १ जून १९७५ लोकविलक्षण नाटककार – टेनिसी विलियम्स , सकाळ कोल्हापूर (रविवार आवृत्ती) : १२ चेम्मीन (चित्रपट परीक्षण) : महाराष्ट्र टाईम्स (रविवार आवृत्ती) ९ ऑक्टोबर १९६६, जीवनदर्शी चित्रपट निर्माता सत्यजित रे : सकाळ कोल्हापूर (रविवार आवृत्ती) ३१ डिसेंबर १९८२ भारतीय कलासंवेदनशीलतेचा आत्मत्रयी अविष्कार : अलममेलकर : सकाळ कोल्हापूर (रविवार आवृत्ती) १९ डिसेंबर १९८२ ललितकला व लालीतवाङ्मय ( दु. का. संत ) सकाळ कोल्हापूर (रविवार आवृत्ती ) १९ जुन १९८३, ला बातार्द ( पुस्तक परिचय ) महाराष्ट्र टाईम्स (रविवार आवृत्ती ) ७ मे १९६७, कविता आणि प्रतिमा ( सुधीर रसाळ) सकाळ कोल्हापूर : (रविवार आवृत्ती) ३ जुलै १९८३ इत्यादी लेख उल्लेखनीय आहेत.

प्रा. प्रभाकर पाटील यांच्या प्रकाशित पुस्तकांमध्ये *अभिहत* (तीन अंकी नाटक) मंदाकिनी प्रकाशन, कोल्हापूर (१९८६), *आदिदास्य* (तीन अंकी नाटक) आल्बेर काम्यू यांच्या कालीगुल्यातील कथा वस्तूबीजाचा मराठी नाट्याविष्कार, आभा प्रकाशन (२७ फेब्रुवारी २०२०) हे नाटक *अभिहत* व *आदिदास्य* ही दोन्ही नाटके समाज व्यवहारात मनुष्यतत्त्व आणि माणूसपण कसे हरवत चालले आहे, हे तत्कालीन वास्तव समस्यांचे गंभीर दर्शन घडवितात. आदिदास्य त्यांचे दुसरे नाटक पाश्चात्य नाटकाचा मराठी अविष्कार असला तरी प्रभाकर पाटील यांच्या अभ्यासपूर्ण लेखणीतून उतरलेले एक वैचारिक नाटक आहे. जे मानवी जाणिवेला समग्र अस्तित्वाविषयी अंतर्मुख करते. त्यांची नाटके महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत विविध केंद्रातून २५-३० वर्षे सातत्याने सादर झाली.

प्रा. पाटील यांच्या अभिमत या नाटकाचा गुजराती भाषेत अनुवाद झाला आहे. अहमदाबाद दूरदर्शनवर त्याची आवती कालनी संवाद या नावाची मालिका तेरा भागात प्रकाशित झाली. याशिवाय प्रा. पाटील यांनी अनेक एकांकिका लिहिल्या आहेत. त्यापैकी काही एकांकिका राम कोलारकर यांनी संपादित केलेल्या ग्रंथात समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांनी, नाट्यमंडळांनी या एकांकीकाचे सादरीकरण केले. प्रा. पाटील अनेक चर्चासत्रात सहभाग घेतला. मराठी भाषा सर्जनशील लेखन, आधुनिक मराठी साहित्य, भाषाविज्ञान, मराठी माध्यमांचा वापर या व इतर अनेकविध विषयासंबंधीचे मार्गदर्शनपर व्याख्याने तसेच शोधनिबंधांचे वाचन त्यांनी केले आहे.

प्रा. प्रभाकर पाटील हे बहुश्रुत व्यक्तिमत्व होते, विद्यार्थिप्रिय शिक्षक होते. त्यांच्या अध्यापनाचा विद्यार्थ्यांवर मोठा परिणाम होत असे. त्यांच्यामध्ये चित्रपट, कला, साहित्य यांच्यातील समन्वय साधण्याची एक सृजनशील दृष्टी

होती. अनुभवाने नाट्यक्षेत्रातील त्यांचे समीक्षात्मक लेखन हे मराठी साहित्य क्षेत्रास लाभलेले समृद्ध करणारे आहे. मराठी साहित्य व कला क्षेत्रात व्यस्त असताना अकाली हृदय विकाराने २८ ऑगस्ट १९९६ रोजी निधन झाले.

## प्रा. रमेश केशव ढावरे



प्रा. रमेश ढावरे हे शिस्तशीर अभ्यासक व संशोधक होते. मराठी अधिविभागाची १९७९ साली नव्यानेच सुरुवात झाली होती. नवनवीन विषयाचे अध्यापन करण्याचा त्यांनी स्वइच्छेने भार उचलला होता. विशेषत: विभागाच्या उभारणीत त्यांनी निष्ठेने कार्य पार पाडले. आंबेडकरवादी प्रणालीचे ते कार्यकर्तेही होते. त्यामुळे त्यांचा लोकसंग्रह ही अमर्याद होता. अशा या अभ्यासू व कर्तृत्वशील व्यक्तिमत्वाचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा या गावी झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण त्यांच्या मूळगावी झाले. महाविद्यालयीन शिक्षण पंढरपूर येथे झाले. पदव्युत्तर शिक्षण कोल्हापूर येथील मराठी अधिविभागातून पूर्ण झाले. प्रा. एस. एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ते 'सत्यशोधक क्रांतीबा महात्मा ज्योतिबा फुले जीवन व कार्य' या विषयावर पीएच.डी.संशोधनाचे कार्य करत होते. परंतु, त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांचा प्रबंध अपूर्ण राहिला. अधिविभागात एम. फिल. पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याच्या कामात हे त्यांनी विशेष सहकार्य केले होते. साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, लोकसाहित्य, दलितसाहित्य या अभ्यास पत्रिकेंचे ते अध्यापन करत. दलित आणि वैचारिक साहित्य हे त्यांचे विशेष अभ्यास क्षेत्र होते. समाजमूल्ये आणि विद्यार्थ्यांबद्दल त्यांना आतिशय आत्मीयता होती. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानग्रहण करणे इथपर्यंत सीमित न ठेवता अध्ययनास असणाऱ्या साहित्यकृतीबद्दल स्वत:चा दृष्टिकोन तयार करण्याची मानसिकता ते तयार करत.

आंबेडकरवादी विचारधारा असणारे प्रा. रमेश ढावरेंनी त्यावेळी प्रकाशित होणाऱ्या सोबत साप्ताहिकातून लेखन करीत असत म. फुलेंच्या समाजकार्याच्या भूमिकेवर गांगल या व्यक्तीनी शंका व्यक्त केली त्यावेळी त्यांच्या मताचे खंडन करून म. फुलेंची प्रमाणिक कार्यप्रणाली पटवून देण्यासाठी एक पुस्तिका लिहिली त्या पुस्तिकेचे नाव *महात्मा फुले विपर्यास आणि वस्तुस्थिती* असे होते. अतिशय परखड शब्दात त्यांनी या सत्याचा अपलाप करणाऱ्या टीकेचे खंडण केले. मुळातच ते कृतिशील व्यक्तिमत्व होते त्यांनी दलित चळवळीतील जेष्ठ विचारवंत राजा ढाले यांच्यासोबत 'धम्मालिपी' नावाचे मासिक संपादित करत होते. त्या मासिकातून ढावरे यांचे महत्त्वपूर्ण संशोधनपर लेख प्रकाशित होत. त्यामध्ये शस्त्रक्रियेच्या टेबलावर या नावाचे सदर चालत. त्या अंतर्गत ढावरे यांचे काही लेख प्रकाशित झाले आहेत. या मासिकातून ते हिंदू धर्म व बौद्ध तत्त्वज्ञान यांच्यातील भिन्न विचारसरणीच्या प्रत्यंतराची मांडणी करत असत. त्याचबरोबर दलित चळवळीतील महत्त्वपूर्ण कार्यकर्त्यांची विशेष ओळख ते आपल्या 'धम्मालिपी' या मासिकातून जनसामान्यांना करून देत. त्याचबरोबर त्यांनी म. फुलेंच्या कार्याविषयी विपुल लेखन केले. ते त्या काळी इतिहास अधिविभागातून प्रसिद्ध होणाऱ्या 'लोकशाही दंडक' मासिकातून प्रकाशित झाले होते. कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर येथे ते आंबेडकरवादी चळवळ, दलित साहित्य, दलित पँथर व समाजप्रबोधन इत्यादी विषयासंबंधी मार्गदर्शनपर चर्चासत्राचे ते आयोजन करत. ते कथा, कविता या वाङ्मय प्रकारातही लेखन करत. अन्याय, अत्याचार, बंडखोरी वृत्ती इत्यादी महत्त्वपूर्ण विषय त्यांच्या साहित्य लेखनाचे केंद्र होते.

विशेषतः १९७४ च्या नामांतर हक्क मराठवाडा विद्यापीठ आंदोलनामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. दलित पँथर स्थापनेमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. दलित पँथर स्थापनेमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्याचबरोबर

१९७८ ते १९८२ च्या दरम्यान ते सांगलीच्या आकाशवाणी केंद्रातून 'मुक्तचिंतन' या कार्यक्रमाद्वारे फुले, शाहू, आंबेडकर यांच्या कार्याचे सामाजिक सांस्कृतिक महत्त्व पटवून देत. अशा हरहुन्नरी व्यक्तिमत्वाचा अकाली १९९१ साली हृदयविकाराने मृत्यू झाला.

## डॉ. रवींद्र ठाकूर



डॉ. रवींद्र ठाकूर हे मराठी भाषेतील कादंबरीकार, कवी लेखक व समीक्षक म्हणून ओळखले जातात. प्रा. ठाकूर यांचे संपूर्ण नाव रवींद्र नारायण ठाकूर असे असून त्यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील उत्राण (ता.एरंडोल) या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव जि. औरंगाबाद येथून पूर्ण झाले. सुप्रसिद्ध लेखक आनंद यादव यांच्या मार्गदर्शनाखाली र. वा. दिघे यांच्या साहित्यावर पीएच. डी. पदवी (१९९०) प्राप्त केली. प्रारंभी दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय उदगीर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, कोल्हापूर येथे अध्यापनाचे कार्य केले (१९८५ ते १९९२ ) त्यानंतर १९९२ ते २०१७ या काळात शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी एम.फिल. आणि पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले आहे. त्यांनी विविध पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. तसेच त्यांचे विविध विषयावरील संशोधनपर लेखनही प्रकाशित झाले आहे. याशिवाय विश्वकोश आणि मराठी वाङ्मयकोशासाठी अनेक नोंदीचे लेखन केले आहे. अनेक चर्चासत्रामधून निबंधवाचन, तसेच वाङ्मयीन विषयावर अनेक महाविद्यालये, साहित्यसंमेलने आणि विद्यापीठातून व्याखाने दिलेली आहेत. शिवाजी विद्यापीठ अधिसभा व अनुवाद आयोगाच्या समित्यावर सदस्य म्हणून ते काहीकाळ कार्यरत होते. डॉ. रवींद्र ठाकूरांचे वाङ् मयीन लेखन लेखन विपुल आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक समीक्षापर ग्रंथ इत्यादी लेखनासह काही संपादित व अनुवादित ग्रंथाची निर्मिती त्यांनी केली आहे. कवितासंग्रहामध्ये *अनिकेत* (१९८१) दस्तुरखुद्द (२००४) *वर्तमान*, कथासंग्रहाअंतर्गत *पीळ आणि इतर कथा* (२०१६), तर कादंबरी साहित्यप्रकारामध्ये *महात्मा* (१९९९), *उद्या, पुन्हा हाच खेळ* (१९९९), *धर्मयुद्ध* (२००३) *व्हायरस* (२००८) *दाही दिशा* इत्यादी कादंबऱ्या प्रकाशित आहेत. तर *क्रांतीसंगर* (२०११), *महारथी कर्ण* (२०१७) इत्यादी नाटक प्रकाशित आहेत. *मराठी ग्रामीण कादंबरी* (१९९३), *आनंद यादव व्यक्ती आणि वाङ्मय* (१९९५), साहित्य, *समीक्षा आणि संवाद* (१९९९) *प्रवाह आणि प्रतिक्रिया : १९९५ नंतरच्या कवितेचा साक्षेपी आढावा* (१९९९) *मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा* (२००७), *साहित्यिक आनंद यादव* (२०११), *मराठी कादंबरी सूची* इत्यादी समीक्षापर ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. संपादित लेखनामध्ये *क्रांतीजागर* (१९९९), *ना. वि. जोशीकृत पुणे वर्णन* (२००१), *साहित्य संवाद* (२००३), *आत्मसंवाद* (२००६), *अविष्कार* (२०१३) इत्यादी ग्रंथाचा समावेश आहे. *निवडणुकीतील घोटाळा* (२००१) हे त्यांचे अनुवादित पुस्तक आहे. विशेषतः डॉ. रवींद्र ठाकूर सरांच्या पुस्तकांचे इतर भाषेत अनुवाद झालेले आहेत. इंग्रजी अनुवाद *महात्मा – The great soul* (2009) हिंदी अनुवाद *महात्मा - महानायक*, इंग्रजी इ-बुक – *Mahatma Jyotirao Phule* (2018) E Book असे काही अनुवाद झाले आहेत.


त्याचबरोबर सोलापूर व कोल्हापूर आकाशवाणी केंद्रातून *महात्मा* कादंबरीचे क्रमश: प्रसारण २००१, २००२ साली झाले. पारिवारिक साहित्य संमेलन आरग (मिरज) २००४, दहावे जनसाहित्य संमेलन, मोझरी (२००५)

ग्रामीण साहित्य संमेलन, कोल्हापूर (२०१२), तसेच समतावादी विद्यार्थी साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविलेले आहे.

डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या ग्रंथास विविध मान्यवर संस्थांचे प्राप्त झाले आहेत. ज्यामध्ये भि. ग. रोहमारे उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार १९९५, शिवाजी विद्यापीठाचा ग्रंथ पुरस्कार १९९५ *आनंद यादव : व्यक्ती अमी वाङ्मय* या ग्रंथासाठी मिळाला आहे. तर महानुभाव विश्वभारती पुरस्कार १९९६ *कादंबरीकार र. वा. दिघे.* ग्रंथास, रणजीत देसाई पुरस्कार २००० आणि मेहता पब्लिशिंग हाउस पुणे, रा. तु. पाटील परखड पुरस्कार २००२ *महात्मा* कादंबरीस, शिवाजी विद्यापिठाचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २००६, *साहित्य : समीक्षा आणि संवाद* ग्रंथास, जनसारस्वत पुरस्कार अमरावती डॉ. जे. पी. नाईक पुरस्कार, जळगाव सूर्योदय साहित्यगौरव पुरस्कार, जळगाव वि.भि.कोलते ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार २०१३, *साहित्यिक आनंद यादव* या समीक्षा ग्रंथास प्राप्त झालेले आहेत. तसेच २००७ चा शिवाजी विद्यापीठाचा गुणवंत शिक्षक पुरस्कारसुद्धा त्यांना प्राप्त झाला आहे.

सेवानिवृत्तीनंतरही सरांचे लेखनकार्य सुरू आहे. ते विविध चर्चासत्रामध्ये सहभागी असतात. मराठी साहित्यक्षेत्रात अतिशय लक्षणीय स्वरूपाचे साहित्यलेखन त्यांनी केले आहे. ग्रामीण सामाजजीवनातील विविध पैलूंचे अतिशय पारदर्शी चित्रण ठाकूर यांच्या लेखनातून निदर्शनास येते.

### प्रा.डॉ.विश्वनाथ शिंदे



मराठी विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. सध्या ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे महात्मा फुले अध्यासन केंद्राचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. विविध महाविद्यालय व विद्यापीठात त्यांनी २७ वर्षे अध्यापन केले आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे मराठी विभागात १९९२ साली प्रपाठक म्हणून ते रुजू झाले. लोकसाहित्य या अभ्यासशाखेत त्यांनी विशेष लेखन आणि संशोधन कार्य केले.लोकसाहित्याचे अभ्यासक आणि संशोधक म्हणून त्यांची विशेष ओळख आहे.

लोकसाहित्याच्या अनुषंगाने त्यांचे विपुल लेखन प्रकाशित झाले आहे. *लोकधाटी :अवलोकन व विचार, पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य, शाहिरी वाङमयाची धारा,लोकसाहित्य मीमांसा भाग एक आणि दोन, लावणीचे लावण्य , मराठी शाहिरी पोवाडा, मराठी पोवाडा, शोधयात्रा लोक रंगभूमीची, मोनोग्राफ ऑफ मराठी पोवाडा* (इंग्रजी) यासारख्या अनेक ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. विविध मासिके आणि नियतकालिकांतून लोकसाहित्याच्या अनुषंगाने १०० हून अधिक शोधनिबंधांचे लेखन त्यांनी केले आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक चर्चासत्रात शोधनिबंधाचे सादरीकरण केले आहे. दांगटी पोवाडा, माणदेशी तमाशा, तमाशातील देशियतेची अंगे, लोकसाहित्याचे मौखिक स्वरूप, मराठी समीक्षेतील नवे प्रवाह,गोंधळ: एक प्रयोगरुप कला ,१९६० नंतरचे मराठी साहित्य आणि स्त्रीवाद, लोक लढे लोकप्रबोधन व लोककला, भारतीय संत साहित्य आणि लोकसाहित्याच्या नव्या दिशा,मराठी प्रायोगिक नाटक हे त्यांचे शोधनिबंध विशेष चर्चेचे ठरले आहेत. मराठी वाङ्मय कोशात काही लेखन नोंदी त्यांनी केल्या आहेत. वर्तमानपत्रातून त्यांनी विपुल स्वरूपात लेखन केले आहे.

मराठी तमाशा आणि वगनाट्य, मराठी दंतकथा, मोनोग्राफ ऑफ मराठी पोवाडा, लोकदेव खंडोबा आणि वाघ्यामुरळीचे जागरण यासारख्या बृहद संशोधन प्रकल्पांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग आणि तत्सम संस्थाद्वारा अनुदान प्राप्त झाले होते. राष्ट्रीय पातळीवरील अनेक चर्चासत्रात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांचा कायम सहभाग राहिला आहे. अनेक नामांकित व्याख्यानमालेत त्यांनी व्याख्याने दिली आहेत. एस.एन.डी.टी विद्यापीठ मुंबई, सोलापूर विद्यापीठ सोलापूर, उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या विद्यापीठांच्या अभ्यास मंडळ आणि निवड समित्यांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात अनेक चर्चासत्र व  उद्बोधन वर्गांचे आयोजन त्यांनी केले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनेक समित्या, मराठी राजभाषा स्थायी समिती इत्यादी अनेक शासकीय व अशासकीय समित्यांवर सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. याशिवाय शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट आणि मॅनेजमेंट कौन्सिलचे ते माजी सदस्य आहेत. साहित्य आणि संशोधन क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा अनेक पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. शिवाजी विद्यापीठाचा उत्कृष्ट पीएच.डी. प्रबंधासाठीचा वि.रा. करंदीकर पुरस्कार यांना १९८८ साली प्राप्त झाला आहे. तसेच यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी साहित्य परिषद पुणे, लोकसाहित्य संशोधन मंडळ औरंगाबाद ,साहित्य अकादमी फेलोशिप,  दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर यासारख्या साहित्य संस्थांकडून त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा गौरव करण्यात आला आहे. भटके विमुक्त जाती जमाती संघटना पुणे या संस्थेचे कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. तसेच समाज विकास व संशोधन संस्था मुंबई या सामाजिक संस्थेमध्ये सदस्य म्हणून, तर तिमिर भेद भटके-विमुक्त आधार केंद्र भोगाव सोलापूर या संस्थेमध्ये उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

## डॉ. कृष्णा किरवले



डॉ. कृष्णा किरवले हे जेष्ठ संशोधक व विचारवंत म्हणून ओळखले जातात. पुरोगामी आणि आंबेडकरी चळवळीतील प्रभावी वक्ते म्हणून त्यांची विशेष ख्याती होती. त्यांचे संपूर्ण नाव कृष्णा रामभाऊ किरवले. त्यांचा जन्म बीड जिल्ह्यातील टाकळी आचार्य (ता. परळी वैजनाथ) या गावी झाला. प्रा. किरवले यांचे शालेय शिक्षण बीड जिल्ह्यातच झाले. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पूर्ण झाले. डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'महाराष्ट्रातील दलित शाहीर आणि त्यांच्या शाहिरी" या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथून पीएच. डी. पदवी (१९८७) प्राप्त केली. गरवारे वाणिज्य महाविद्यालय पुणे (१९८७ -१९९०), पुणे विद्यापीठ, पुणे (१९९०-१९९६) सहायक व सहयोगी प्राध्यापक म्हणून ते कार्यरत होते. त्याचबरोबर पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक (१९९९-२००२) होते. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मराठी विभागात २००२ ते २०१६ या काळात प्राध्यापक या पदावर ते कार्यरत होते. २००५ ते २००८ आणि २०१४ ते २०१६ या कालावधीत त्यांनी विभागप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळला आहे. त्याचबरोबर कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या डॉ.

बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक (२००५ -२०१६ ) होते. मध्युगीन मराठी वाङ्ग्याचा इतिहास, सौंदर्यशास्त्र, वैचारिक साहित्य, दलित साहित्य या अभ्यासपत्रिकेचे ते अध्यापन कर.त लोकवाङ्मय व शाहिरी वाङ्मय, दलित वाङ्मय, मध्ययुगीन मराठी वाङ्मय ही त्यांची विशेष अभ्यास क्षेत्र होती. विशेषतः आंतराष्ट्रीय कार्यक्रमातही त्यांचा सहभाग होता. १ जुलै २००१ ते २९ जुलै २००१ या कालावधीत ते जपान देशातील दयतोबुंका विद्यापीठ, टोकियो येथील 'जपानमधील बुद्ध धम्म' या विषयावर संशोधन करण्यासाठी गेले होते.. यावेळी 'भारतीय बुद्ध धम्म' आणि दलित साहित्याच्या अनुषंगाने त्यांनी व्याखाने दिली होती. प्रा. किरवले यांचे *आंबेडकरी शाहिरी एक शोध* (१९९२), *ग्रामीण साहित्य* (१९९२), *दलित चळवळ आणि साहित्य* (१९९६), *संघरक्षितांची अधम्म चळवळ* (१९९९), *आरक्षण तत्त्व : वास्तव आणि विपर्यास* (२००६) *जातीअंताचा लढा एक मुक्तचिंतन* (२००७), *भारतीय साहित्याचे निर्माते बाबूराव बागूल* (२०१२) इत्यादी स्वलिखित ग्रंथ आहेत. तर संपादित ग्रंथ *समग्र लेखक बाबूराव बागूल*' (२००२), *दलित – ग्रामीण साहित्य शब्दकोश खंड पहिला (अ ते घ )* (२०१२) आणि *दलित – ग्रामीण साहित्य शब्दकोश खंड पहिला (च ते न )* (२०१३) इत्यादी ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

प्रा. किरवलेंनी मराठी साहित्य क्षेत्रात दलित व ग्रामीण साहित्य संकल्पनेची सैद्धान्तिक मांडणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. दोन बृहत संशोधन प्रकल्प ही पूर्ण केलेले आहेत. त्याअंतर्गत 'दलित – ग्रामीण साहित्य शब्दकोश' : तीन खंड प्रकाशित, 'Impact of wild sericulture on socio economic development of tribal and economically weaker sections and women Empowerment from western Maharashtra – CSIR , New delhi हे दोन प्रकल्प होत. प्रा. किरवले यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध लेख प्रसिद्ध झाले आहे.

त्यापैकी वारकरी संप्रदाय, नवे वाङ्मयीन प्रवाह, महात्मा फुलेंची सामाजिकता, मराठी नाटक आणि रंगभूमी, दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, मराठी भाषा आणि साहित्य संचित, मराठी शाहिरी वाङ्मय आणि विकास, मराठी भाषा उपजीविकेचे साधन बनायला हवी, मराठी मध्ययुगीन वाङ्मय व संकल्पना या विविध विषयावर लेख प्रसिधद्ध आहेत त्याचबरोबर प्रा. किरवले सरांनी चर्चासत्र व कार्यशाळेमध्ये विविध विषयावर शोधनिबंध वाचलेले आहेत. त्या अंतर्गत महात्मा फुले आणि आधुनिक भारत, ग्रामीण व दलित साहित्याची वाटचाल, दलित रंगभूमी, मराठी तमाशाची पूर्व परंपरा या व इतर अनेक विषयावरती शोधनिबंध वाचन केलेले आहे. त्याचबरोबर त्यांनी अनेक परिसंवादामध्ये प्रमुख वक्ते म्हणून सामाजिक व सांस्कृतिक विषयावरती आणि साहित्य, समाज, भाषासंस्कृती भाषेचे कृतीशील उपक्रम भाषा माध्यमे इत्यादी संबधी आपले अभ्यासपूर्ण विवेचन मांडलेले आहे.

प्रा. किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांनी पीएच.डी. आणि १८ विद्यार्थ्यांनी एम. फिल. पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार' औरंगाबाद १९९२ (*आंबेडकरी शाहिरी : एक शोध* या संशोधनपर ग्रंथासाठी), 'दया पवार स्मृती पुरस्कार', परिवर्तन साहित्य महामंडळ मुंबई २००३ (सामाजिक व संशोधन कार्यासाठी ), 'महाराष्ट्र शासन साहित्य संस्कृती मंडळाचा रा. ना.चव्हाण वाङ्मय पुरस्कार' मुंबई २००३ (*समग्र लेखक बाबूराव बागूल*), 'परिवर्तनवादी वाङ्मय सेवा पुरस्कार', शाहू शिक्षण संस्था पंढरपूर २००७ (सामाजिक व वाङ्मयीन कार्यासाठी) 'आंबेडकरी गौरव पुरस्कार', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. (सामाजिक व आंबेडकर चळवळीतील सहभागासाठी)', 'शिक्षक गौरव, शिव महोत्सव, आजी माजी विद्यार्थी स्नेह मेळावा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. आदी पुरस्कार प्राप्त. तर काही संमेलनांचेही अध्यक्ष स्थान त्यांनी भूषविले

आहे. दुसरे  अखिल भारतीय आंबेडकरी युवा परिषद, नागपूर (२२ फेब्रुवारी २००९), दुसरी अखिल भारतीय आंबेडकरी वैचारिक साहित्य संमेलन, सोलापूर (१४ व १५ जानेवारी २०११), ३१ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन, जळगाव (२३ व २४ नोव्हेंबर २०१२), पहिले अखिल भारतीय नागवंशीय सम्यक क्रांती साहित्य संमेलन वालचंदनगर ता. इंदापूर जि. पुणे, (२५ मे २०१३) इत्यादी संमेलनांचे त्यांनी अध्यक्षस्थान भूषविले.  प्रा किरवले यांनी मराठी भाषेसंबधी अनेक कृतीशील कार्यक्रम राबविले. मराठी भाषेचे संवर्धन व जोपासना करण्याकरिता ते सदैव आग्रही राहिले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी विविध साहित्य व सामाजिक उपक्रमांत सहभाग नोंदविला.  वयाच्या ६३ व्या वर्षी त्यांचे ३ मार्च २०१७ रोजी आकस्मिक निधन झाले.

**प्रा. राजन गवस**



मराठी साहित्यात ख्यातनाम लेखक म्हणून राजन गवस सर्वपरिचित आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापक आणि विभागप्रमुख या पदावरून ते २०१९ साली सेवानिवृत्त झाले. करंबळी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) हे त्यांचे जन्मगाव. भाऊ पाध्ये यांची कथा हा त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाचा अभ्यास विषय होता. कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे याठिकाणी प्राध्यापक म्हणून त्यांनी काही काळ अध्यापन केले आहे. मराठी साहित्यात जवळपास चाळीस वर्ष ते सातत्याने लेखन करत आहेत. कथा, कादंबरी, कविता, ललित, समीक्षा इत्यादी विविध प्रकारातून त्यांनी लेखन केले आहे. *चौंडकं, भंडारभोग, धिंगाणा, कळप, तणकट, ब-बळीचा* या त्यांच्या कादंबऱ्या मराठी साहित्यात विशेष चर्चेत राहिल्या. *रिवणावायली मुंगी, आपण माणसात जमा नाही* हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. *हुंदका* हा काव्यसंग्रहही प्रसिद्ध झाला आहे. *काचाकवड्या, कैफियत, लोकल ते ग्लोबल* इत्यादी पुस्तकातून त्यांनी ललित लेखन केले आहे. *भाऊ पाध्ये यांची कादंबरी, रोकडे पाझर, भाऊ पाध्ये यांची कथा,  तृतीयपंथीयांची बोली, लैंगिक लोककथांचा मानसशास्त्रीय अभ्यास,भाषिक सर्जन आणि उपयोजन* इत्यादी ग्रंथातून त्यांनी समीक्षा लेखन केले आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांचा सांगोपांग चर्चा करणारे *चांगदेव चतुष्ट्यासंबंधी* संपादन प्रसिद्ध आहे. त्यांच्या *तणकट* या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. संस्कृती पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका, लाभसेटवार पुरस्कार अमेरिका, ह.ना.आपटे पुरस्कार महाराष्ट्र शासन, वि. स. खांडेकर पुरस्कार, भैरूरतन दमाणी पुरस्कार, नरहर कुरुंदकर पुरस्कार, महेश निकम पुरस्कार इत्यादी विविध नामांकित पुरस्कारांनी त्यांच्या साहित्यकृतींना गौरविण्यात आले आहे.

'मुराळी' या खेड्यापाड्यातील स्त्रियांच्या समस्या मांडणाऱ्या, त्यांच्या वाचनाची आवड जोपासणाऱ्या आणि नवीन लिहू पाहणाऱ्या लेखकांना प्रोत्साहन देणाऱ्या मासिकाची त्यांनी सुरुवात केली. गेल्या तेरा वर्षापासून ते या मासिकाचे संपादक म्हणून कार्य पाहात आहेत. विविध चर्चासत्र आणि व्याख्यानांतून त्यांनी आपले विचार सातत्याने मांडले आहेत. महाराष्ट्रातील अनेक सामाजिक सांस्कृतिक चळवळीत त्यांचा सहभाग राहिला आहे. विशेषत: महाराष्ट्रातील देवदासी चळवळीत त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय स्वरूपाचे आहे.

साहित्य अकादमीच्या जनरल कौन्सिल कमिटी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ऍडव्हान्स स्टडी शिमला, भाषा सल्लागार समिती महाराष्ट्र शासन, महात्मा गांधी इन्स्टिट्यूट मॉरीशस, महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका, भवरलाल

जैन प्रतिष्ठान जळगाव या महत्त्वाच्या संस्थांवर सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, बनारस हिंदू विश्वविद्यालय बनारस, सयाजीराव गायकवाड विद्यापीठ बडोदा, गोवा विद्यापीठ गोवा या विद्यापीठांच्या अभ्यास मंडळावरती विषयतज्ज्ञ, सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

राजन गवस यांच्या समग्र कादंबऱ्या मराठी वाङ्मयीन क्षेत्रात प्रयोगशील कादंबऱ्या म्हणून आजही चर्चेत आहेत. कृषीजन संस्कृतीचे साहित्य ही नवी संकल्पना मराठी साहित्यामध्ये त्यांनी मांडली. त्यांच्या *चौंडकं, भंडारभोग, तणकट, ब-बळीचा* तसेच तेरा कथांचा कन्नड इंग्रजी-हिंदी आसामी गुजराती इत्यादी विविध भाषांमध्ये अनुवाद केला आहे. राजन गवस यांच्या समग्र साहित्यावर अनेक विद्यापीठातून एम.फिल. आणि पीएच.डी. पदवीसाठी संशोधन करण्यात आले आहे. 1975 ते 1989 या कालावधीत देवदासी चळवळीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. जटामुक्ती चळवळीमधील त्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. समाजशील जीवनदृष्टी, ऐंशीनंतरचा ग्रामीण महाराष्ट्र, उपेक्षित वंचित समूहदर्शन, देशी कथनशैली या दृष्टीने त्यांचे कथात्म साहित्य महत्त्वाचे ठरते. देवदासी समूह जीवनाचे अंर्तभेदी दर्शन मांडणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या लक्षवेक्षी ठरल्या आहेत. त्यांनी १३ ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. याशिवाय महाराष्ट्रातील प्रख्यात ८५ व्याख्यानमालामध्ये त्यांनी व्याख्याने दिली आहेत. महाराष्ट्रातील विविध साहित्य संमेलनांचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

❒❒❒